**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ८०/२०२३ मधील निशाणी क्र. ४० कडील अर्जावर आदेश.</u>**

१) अर्ज वाचला. म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांतील विद्वान वकीलांना ऐकले. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

२) अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. ४ ने निशाणी क्र. ३४ कडील अर्जावरील आदेशाप्रमाणेची खर्चाची रक्कम वादीला दिली नसल्याने किंवा न्यायालयात जमा केली नसल्याने प्रतिवादी क्र. ४ विरुद्ध निशाणी क्र. १ वर दिनांक ०६/०७/२०२३ रोजी पारीत केलेला प्रकरण विना कैफीयत चालविण्याबाबतचा आदेश कायम करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र. ४ ने यापूर्वी निशाणी क्र. ३४ कडील अर्जावरील आदेशाप्रमाणे खर्चाची रक्कम जवळपास तीन महिने वेळ घेऊनही न्यायालयात जमा केली नाही अथवा वादीला दिली नाही. वरील सर्व बाबी विचारात घेता माझ्या मते प्रतिवादी क्र. ४ यांनी वादीला देणे असलेल्या निशाणी क्र. ३४ कडील अर्जावरील आदेशाप्रमाणेच्या खर्चाच्या रक्कमेव्यतिरिक्त रुपये २००/– इतकी खर्चाची रक्कम आजच्या आज न्यायालयात जमा करण्याच्या अटीवर प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायाचे व उचित आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) प्रतिवादी क्र. ४ याने निशाणी क्र. ३४ कडील अर्जावरील आदेशाप्रमाणेच्या खर्चाच्या रक्कमेव्यतिरिक्त रुपये २००/– इतकी खर्चाची रक्कम आजच्या आज न्यायालयात जमा करण्याच्या अटीवर प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येतो व त्यानुसार निशाणी क्र. १ वर

दिनांक ०६/०७/२०२३ रोजी प्रतिवादी क्र. ४ विरुध्द पारीत केलेला प्रस्तुत दावा विना कैफियत चालविण्याबाबतचा आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र. ४ यास कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

२) निशाणी क्र. ३४ कडील अर्जावरील आदेशाप्रमाणेची खर्चाची रक्कम रुपये ३००/– व या अर्जावरील आदेशाप्रमाणेची खर्चाची रक्कम रुपये २००/– ही प्रतिवादी क्र. ४ ने या न्यायालयात जमा केल्यावर सदर रक्कम काढून घेण्यास वादी पात्र आहे.

३) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.08.14 17:46:10 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांक– १४/०८/२०२४ २रे सह दि.न्या. व. स्तर, कराड.